ePaper

## तरुणांना बँकेत संधी हवी, पण वयस्कर लोक देत नाहीत; अजित दादांचे टोमणे!



| वर्ष - 7 | अंक - 251 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 20 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- ऑस्ट्रेलियाने रचला इतिहास!
- रणबीरला चापट मारल्यानंतर...
- 'या' देशाचं भारताच्या पावलावर पाऊल
- २२ जानेवारीला सार्वजनिक सुटी जाहीर


| पिंपरी | महाईन्यूज | |

**शाश्वत शहरी जीवनाच्या दिशेने पाऊल टाकत, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि बीवायसीएस इंडिया फाऊंडेशनच्या सहकार्याने पर्यावरणपूरक वाहतुकीच्या भविष्याला आकार देण्यासाठी राष्ट्रीय सायकल मेअर कार्यशाळा नुकतीच ग.दि.माडगूळकर सभागृहात पार पडली. यामध्ये, देशभरातील सायकल मेअर यांनी सहभाग नोंदवून सायकलिंगच्या पायाभूत सुविधा बाबत विचार मांडून मंथन केले..**



# सायकल मेअरचे 'मंथन'!

## देशभरातील मान्यवरांचा सहभाग : सायकलिंगच्या पायाभूत सुविधा बाबत चर्चा

यावेळी स्मार्ट सिटी मिशन डायरेक्टर कुणाल कुमार, महापालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय कोलते, सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, सायकल मेअर आशिक जैन, बीवायसीएस इंडिया फाऊंडेशनच्या डॉ. भैरवी जोशी, मातृश्री शेट्टी यांच्यासह शहरी नियोजक, वास्तुविशारद, महानगरपालिका अधिकारी आदींनी या चर्चेत सक्रियपणे सहभाग नोंदविला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत सायकलिंगच्या पायाभूत सुविधांबाबत विचारांच्या देवाणघेवाणीसाठी देशभरातील सायकल मेअर एकत्रित करून राष्ट्रीय कार्यशाळेच्या माध्यमातून एक गतिमान व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच, पिंपळे सौदागर परिसरात मनपा व स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या माध्यमातून सुस्थापित केलेल्या सायकल ट्रॅकवर सायकल चालवून सायकल मेअर यांच्या उत्साही सहभागाने शाश्वत वाहतुकीसाठी दृढ समर्पण दर्शविले. सायकलिंगच्या पलीकडे, कार्यशाळेच्या मालिकेमध्ये शहरी नियोजन, डिझाइन आणि पथ व्यवस्थापन या महत्वाच्या पैलूंवर चर्चा करण्यात आली.

> पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी नॉन-मोटराइज्ड ट्रान्सपोर्ट इन्फ्रास्ट्रक्चर वाढवण्याची कटिबद्ध आहे. भविष्याची संकल्पना, शाश्वत शहरी वाहतुक केवल एक पर्याय नसून एक महत्वाची गरज आहे. "सायकल मेअर नेटवर्कसारख्या गटांच्या पाठिंब्याने, आमच्या प्रयत्नांना गती मिळत आहे.
> **-शेखर सिंह,** महापालिका आयुक्त.

### हिरवे रस्ते, आनंदी रस्ते!




"हेल्दी स्ट्रीट्स लीड टू हॅप्पी स्ट्रीट्स" या थीम अंतर्गत आयोजित कार्यशाळेने शाश्वत वाहतुकीला चालना देण्यासाठी शहरी रस्त्यांच्या पायाभूत सुविधांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. बीवायसीएस इंडिया फाऊंडेशन द्वारे पिंपरी चिंचवड महापालिकेची सक्रिय भूमिका, भविष्यासाठी अधिक हिरवे, अधिक उत्साही समुदाय तयार करण्यासाठी वचनबद्धता दर्शवित आहे.

# श्रीराम प्राणप्रतिष्ठा दिनी मांस-मद्य विक्री बंद!

## हिंजवडी ग्रामपंचायतीचा आदर्श : सरपंच गणेश जांभुळकर यांचे आवाहन

| पिंपरी | महाईन्यूज |

**श्रीक्षेत्र अयोध्या येथे प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिर उद्घाटन व प्राणप्रतिष्ठा होत आहे. या निमित्त देशभरामध्ये उत्सव व मंगलमय वातावरण आहे. तसाच उत्सव 'आयटी हब' हिंजवडी गावात साजरा होणार असून, या निमित्त गावच्या हद्दीतील सर्व मांस व मद्य विक्री दुकाने बंद ठेवण्यात यावीत, अशा सूचना हिंजवडी ग्रामपंचायतीने दिल्या आहेत.**



ग्रामपंचायत हिंजवडी

जाहिर सुचना





हिंजवडी गावचे सरपंच गणेश जांभुळकर यांनी याबाबत सर्व व्यावसायिक, दुकानदार आणि हॉटेलमालकांना जाहीर सूचना केली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, दि. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिरामध्ये श्रींची प्राणप्रतिष्ठा होत आहे. त्यामुळे देशभरात उत्सव साजरा होत आहे. तसेच, हिंजवडीतील श्रीराम मंदिरामध्येही मोठा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

त्यामुळे गावात कोणत्याही प्रकारचे मटण, चिकन व मच्छी तसेच देशी व विदेशी मद्य (दारु) विक्री करण्यास बंदी केली आहे. आपण आपली मटण, चिकण, मच्छी विक्री दुकाने, चायनिज दुकाने, मांसाहारी हॉटेल अथवा धाबा, मद्य (दारु) दुकाने मालकांनी कोणत्याही प्रकारे सुरू न ठेवता संपूर्ण बंद ठेवावी. सर्व विक्रेत्यांनी, दुकानधारकांनी या सूचनेची दखल घेवून श्रीराम उत्सव व ग्रामपंचायत हिंजवडीला सहकार्य करावे, असे आवाहन जांभूळकर यांनी केले आहे.

> श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त 'आयटी हब' हिंजवडी ग्रामपंचायत प्रशासनाने मांस व मद्य विक्री बंदीबाबत घेतलेल्या निर्णयाचे परिसरातील श्रीराम भक्त, हिंदू बांधवांनी स्वागत केले आहे. केंद्र सरकारने श्रीराम लल्ला प्राणप्रतिष्ठा दिनी २२ जानेवारी रोजी अर्धा दिवस शासकीय सुट्टी जाहीर केली आहे. तसेच, राज्य सरकारनेही पूर्ण दिवस सुट्टीची घोषणा केली असून, शाळा-महाविद्यालये, सर्व शासकीय अस्थापना बंद राहणार आहेत. त्यामुळे सर्वांनी मोठ्या उत्साहात श्रीराम मंदिर येथील कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.
> **-विशाल साखरे,** मा. सरपंच, सदस्य हिंजवडी ग्रामपंचायत

# मी पण आधी पत्र्याच्या घरात राहायचो!

## मोदी भावूक होताच अजित पवारांना पडता काळ आठवला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सोलापुरातील कार्यक्रमावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM MODI) भावूक झाले होते. त्यानंतर विरोधकांनी यावर टीकास्त्र सोडलं होतं. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पुण्यात प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी आता माणूस आहे, भावुक होणार. जुने दिवस त्यांना आठवले त्यामुळं ते भावुक झाले, असे उत्तर दिले. त्याशिवाय त्यांना पडता काळही आठवला. मी पण आधी पत्र्याच्या, सारवलेल्या घरात राहायचो, आता बंगल्यात राहतो, असे अजित पवार म्हणाले. ते पुण्यात बोलत होते.**



आता तुम्ही जर पत्र्याच्या घरात, छोट्याश्या घरात राहिला असाल. त्यांना त्यांची त्यावेळची अवस्था आठवली असेल आणि पंतप्रधान झाल्यावर आपण अनेकांना घरं देतोय. हे पाहून भावुक झाले असतील. मी पण आधी पत्र्याच्या घरात, सारवलेल्या घरात राहायचो, नंतर बंगला झाला. काळानुरूप परिस्थिती बदलत असते. आता मोदी पंतप्रधान आहेत, मात्र पूर्वीचे दिवस कोणीच विसरत नाही. ते आज त्यांना आठवलं असेल, म्हणून ते भावुक झाले असावेत, असे अजित पवार म्हणाले. गर्दी झाली म्हणून टीका करतेत व्हय. एवढी प्रचंड गर्दी, काय सांगू तुला. आता माणूस आहे, भावुक होणार. जुने दिवस त्यांना आठवले त्यामुळं ते भावुक झाले. घरं चांगली झालीत. कष्टाळू, गरजूंना घरं मिळाली. पंतप्रधान मोदींच्या हस्तेच भूमिपूजन झालं तेंव्हा घरं माझ्या हाताने वितरित होणार, असं त्यांनी बोलून दाखवलं होतं. तो शब्द खरा ठरला. विरोधकांच्या पोटात का दुखतंय, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. महाराष्ट्रात सहकार क्षेत्रामुळे विविध बदल झाले आहेत. सहकार चळवळ मजबूत करण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या संचालक मंडळांनी विश्वासहर्ता जपली पाहिजे. बँकेचे कामकाज करतांना ठेवीदारांच्या विश्वासाला तडा जाता कामा नये, ही काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. कर्जदारांनीदेखील वेळेत कर्ज परत करावे. यामुळे या क्षेत्रात आर्थिक शिस्त लागण्यास मदत होईल. सहकार क्षेत्राला आणखीन मजबूत करण्यासाठी एकत्रित काम करण्याचे आवाहन करून या क्षेत्रातील अडी अडचणी सोडण्यासाठी शासन सहकार्य करेल, असे अजित पवार म्हणाले. पुणे मर्चंटस को-ऑप बँकेला शतक महोत्सवी वर्षात पदार्पण केल्याबद्दल शुभेच्छा देतांना ते म्हणाले, या बँकेच्या वाटचालीमध्ये बँकेच्या आजी-माजी अध्यक्ष, संचालक, अधिकारी, कर्मचारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. शतक महोत्सवी वर्षातील वाटचाल सहकार क्षेत्रातील महत्वाचा टप्पा असून बँकेने आणखीन खूप मोठा टप्पा गाठायचा आहे. बँकेचे कार्यक्षेत्र राज्यस्तरीय करण्याबरोबरच छोट्या व्यवसायिकांना, तरुणांना तसेच पत नसलेल्याही कर्ज देण्याबाबत संचालक मंडळांनी विचार करावा. शतक महोत्सवी वर्षात विविध लोकाभिमुख काम करावे, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले. सर्वांना विश्वासात घेऊन शहरात विविध विकासकामे करण्यात येत असून ही कामे जलद गतीने मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

### सहकार क्षेत्रातील महत्वाचा टप्पा

» विरोधकांच्या पोटात का दुखतंय, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. महाराष्ट्रात सहकार क्षेत्रामुळे विविध बदल झाले आहेत. सहकार चळवळ मजबूत करण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या संचालक मंडळांनी विश्वासहर्ता जपली पाहिजे. पुणे मर्चंटस को-ऑप बँकेला शतक महोत्सवी वर्षात पदार्पण केल्याबद्दल शुभेच्छा देतांना ते म्हणाले, या बँकेच्या वाटचालीमध्ये बँकेच्या आजी-माजी अध्यक्ष, संचालक, अधिकारी, कर्मचारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. शतक महोत्सवी वर्षातील वाटचाल सहकार क्षेत्रातील महत्वाचा टप्पा असून बँकेने आणखीन खूप मोठा टप्पा गाठायचा आहे. बँकेचे कार्यक्षेत्र राज्यस्तरीय करण्याबरोबरच छोट्या व्यवसायिकांना, तरुणांना तसेच पत नसलेल्याही कर्ज देण्याबाबत संचालक मंडळांनी विचार करावा. शतक महोत्सवी वर्षात विविध लोकाभिमुख काम करावे, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

# नृत्य कलाकारांना हक्काचे व्यासपीठ हवे!

## मेहबूब शेख : युवक राष्ट्रवादीतर्फे जिल्हास्तरीय डान्स स्पर्धा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"पिंपरी चिंचवड युवक काँग्रेसने डान्स स्पर्धा आयोजित करून शहरातील अनेक नृत्य कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले याचा मला अभिमान वाटतो. नृत्य कलाकारांच्या अथक परिश्रम बघता राज्य शासनाने नृत्य कलाकार यांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे अशी अपेक्षा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख यांनी व्यक्त केली.**




राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) आयोजित शरद कला व क्रीडा महोत्सव जिल्हास्तरीय डान्स स्पर्धेस शहरातील तीनही विधानसभेतील नागरिकांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

एकूण एक लाख रुपयांहून अधिक रोख रक्कम आणि पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेचे पर्यवेक्षक म्हणून अक्षय ढेरे, प्रेरणा साळवी, भाग्यश्री जाधव यांनी काम पाहिले तर साई काळे व राष्ट्रवादी युवक काँग्रेस टीमने या कार्यक्रमाचे नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने केले. यावेळी माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तात्या तापकीर,राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रकाश मस्के,महिला शहराध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर,प्रदेश संघटक राहुल पवार, युवक कार्याध्यक्ष सागर तापकीर, कामगार नेते काशिनाथ नखाते,भोसरी विधानसभा अध्यक्ष ॲड. संतोष शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने युवक पदाधिकारी उपस्थित होते. सदर स्पर्धा ग्रुप डान्स व सोलो डान्स या प्रकारात घेण्यात आली. ग्रुप डान्स प्रकारात जी एन डी ग्रुप यांनी प्रथम क्रमांक,टीम डान्सहूड ग्रुप यांनी द्वितीय क्रमांक,तृतीय क्रमांक डी डब्ल्यू एम क्र्यू ग्रुप आणि उत्तेजनार्थ क्रमांक गेम चेंजर ग्रुप यांनी पटकावला.

तर सोलो डान्स या प्रकारात नावे प्रथम क्रमांक प्रदीप गुप्ता,द्वितीय क्रमांक साजन तमांग,तर तृतीय क्रमांक इशिता बरवडे,उत्तेजनार्थ क्रमांक -रोहन उंबारे,यांना मिळाला.

यावेळी आयोजकांच्या वतीने सर्व सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात आले.राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांच्या हस्ते या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ पार पडले.

### पवार साहेबांचे योगदान : गव्हाणे

» महाविकास आघाडीचे मावळ लोकसभेचे संभाव्य उमेदवार शिवसेना नेते संजोग वाघेरे यांनी आवर्जून उपस्थिती लावत स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या व राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या टीमचे कौतुक केले. इम्रान शेख म्हणाले की, "पिंपरी चिंचवड शहरातील नृत्य कलाकारांची संख्या लक्षणीय असून महापालिकेने खेळाडू दत्तक योजनेत नृत्य स्पर्धकांना सहभागी करून द्यावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले." सुनील गव्हाणे म्हणाले, की "पवार साहेबांच्या कार्यकर्तृत्वामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या औद्योगीकरणाची भरभराट झाली. पुढे उद्योगनगरीची आयटीनगरी करण्याचं काम देखील आदरणीय पवार साहेबांनीच केलं. ही नगरी आता स्वतःची ओळख सांस्कृतिक नगरी म्हणून करू पाहत आहे. कामगार नगरी ते सांस्कृतिक नगरी या वाटचालीत शरद पवार साहेबांचे योगदान अनन्य साधारण आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये मात्र भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मात्र या शहरात फक्त टक्केवारी खाण्याचे काम केले हे दुर्दैव आहे.

# पिंपरी, आकुर्डीमधील प्रधानमंत्री आवास योजना

# 'लॉटरी'ला अखेर 'मुहूर्त'!

## आमदार लांडगे यांचा पाठपुरावा: तीन वर्षांपासून रखडलेल्या योजनेला गती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने 'प्रधानमंत्री आवास' योजनेंतर्गत पिंपरी आणि आकुर्डी येथे उभारलेल्या प्रकल्पांतील लाभार्थी निश्चित करण्यासाठी उद्या शनिवार, दि. २० जानेवारी रोजी सोडत (लॉटरी) काढण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी यशस्वी पाठपुरावा केला आहे.**





"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांसाठी घर' या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवडमध्ये १९ हजारहून अधिक सदनिका तयार होत आहेत. त्याचा लाभ गरजू नागरिकांना व्हावा, अशी आमची भूमिका आहे. पिंपरी व आकुर्डी येथील प्रकल्पासाठी तांत्रिक अडचणी होत्या. यासाठी महापालिका आणि राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले. आता प्रशासनाने सोडत प्रक्रिया घोषीत केली असून, मार्च-२०२४ पर्यंत संबंधित लाभार्थ्यांना राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याहस्ते चावी वाटप करावे, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

प्रधानमंत्री आवास योजनेंर्गत पिंपरी आणि आकुर्डी येथे उभारलेल्या प्रकल्पातील एकूण ९३८ घरांसाठी अर्ज केलेल्या लाभार्थीना राज्य सरकारकडून 'दिवाळी गिफ्ट' मिळाले आहे. आरक्षण प्रयोजनामध्ये बदल करण्याच्या प्रस्तावाला राज्याच्या नगरविकास विभागाने मान्यता दिली असून, आता सोडतीचा (लकी ड्रॉ) मार्ग मोकळा झाला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी यासाठी यशस्वी पाठपुरावा केला आहे.

PMAY
PRADHAN MANTRI AWAAS YOJANA

पिंपरी आणि आकुर्डी येथे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सदनिका बांधून पूर्ण झाल्या आहेत. सुमारे ११ हजार नागरिकांनी अर्ज केले आहेत. त्यांचे लक्ष या सोडतीकडे लागले होते. विशेष म्हणजे, संबंधित जागांचे आरक्षण 'बेघरांसाठी घरे' असल्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे महापालिका प्रशासनाने बेघरांसाठी घरे (HDH) ऐवजी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) अशा प्रमाणे योजना राबवावी आणि लकी ड्रॉ काढून लाभार्थ्यांना हक्काचे घर लवकर उपलब्ध करुन द्यावे, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी महापालिका प्रशासन आणि राज्य सरकारच्या नगररचना विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने अखेर प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पांतर्गत पिंपरी व आकुर्डी येथे उभारलेल्या प्रकल्पासाठी लाभार्थी निश्चित करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी दि. २० जानेवारी २०२४ रोजी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे सकाळी ९ वाजता सोडत 'लकी ड्रॉ' काढण्यात येणार आहे.

वास्तविक, पिंपरी आणि आकुर्डी येथील प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजनेसाठी उभारण्यात आले. त्यानंतर सदर भूखंड बेघरांसाठी घरे या प्रयोजनार्थ असल्याने सोडत प्रक्रिया राबवण्यात तांत्रिक अडचणी येत होत्या.

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात या विषयाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाले असतानाही सोडत काढून लाभार्थी निश्चित करता आले नाही. महायुती सरकारच्या काळात आमदार लांडगे यांनी राज्याच्या नगरविकास विभागाकडे सदर भूखंडाचे प्रयोजन 'आर्थिक दुर्बल घटकांसाठी घरे' असे करण्याबाबत पाठपुरावा केला. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर लाभार्थी निश्चित करण्याबाबत 'लॉटरी' प्रक्रिया करावी, यासाठी प्रशासनाला सूचना केली होती. त्यानुसार महापालिका प्रशासनाने कार्यवाही केली आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये भव्य सामूहिक श्री रामरक्षा पठण

## आनंदोत्सव: भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे आयोजन

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिर उद्घाटन व प्राणप्रतिष्ठा निमित्त पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या वतीने विविध उपक्रम, कार्यक्रम आणि आनंदोत्सव साजरा केला जात आहे. यासह भव्य सामूहिक श्री रामरक्षा पठणही होणार आहे.**



भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने व संस्कृती संवर्धन व विकास महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जानेवारी रोजी केशवनगर, चिंचवड येथील श्रीमान महासाधू श्री मोरया गोसावी क्रीडांगण येथे सकाळी ७.३० ते ९.३० पर्यंत हा अध्यात्मिक सोहळा होईल. यावेळी प्रसिद्ध अभिनेते व निवेदक राहुल सोलापूरकर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात सहभागी होऊन एक दिव्य सकाळ प्रभू श्रीराम चरणी अर्पण करुयात, असे आवाहन शंकर जगताप यांनी केले आहे. दरम्यान, या सोहळ्याची पूर्व तयारी आढावा आणि नियोजन बैठक झाली. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भास्कर भोर, संतोष सोबळकर, अविनाश आगज्ञान, डॉ. अजित जगताप, विश्व हिंदु परिषदेचे धनंजय गावडे, विजय देशपांडे, भाजपा जिल्हा उपाध्यक्षरविंद्र देशपांडे, भाजपा कोषाध्यक्ष संतोष निंबाळकर, माजी नगरसेवक सुरेशजी भोईर आदी उपस्थित होते.



## मंदिरांमध्ये स्वच्छता मोहिम...!

जगभरातील तमाम हिंदू बांधवांचे तब्बल ५०० वर्षानंतर अयोध्येत प्रभू श्रीरामांचे मंदिर तयार झाल्याचे स्वप्न साकार होणार आहे. या भव्यदिव्य सोहळ्यासाठी देशभरात धार्मिक वातावरण पाहायला मिळत आहे. देशभरातील सर्व मंदिरे, धार्मिक स्थळे व आसपासच्या परिसरात हिंदू बांधवांकडून स्वच्छता केली जात आहे. पिंपळे गुरव येथील हिंदू बांधवांनी ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिर आणि महादेव मंदिर व परिसरात स्वच्छता अभियान राबविले. यामध्ये शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला.




# संरक्षण दलाने पुढे जाताना

**सैनिकाने सतत पुढेच जायचे असले तरी पुढे म्हणजे कुठल्या दिशेला ते ठरवावेच लागते आणि त्यासाठी जरा मागे वळूनही पाहावे लागते. युक्रेन देत असलेले प्रत्युत्तर पाहिल्यास एक निष्कर्ष नक्की निघतो की, ‘शीतयुद्ध-काळाच्या समाप्तीनंतर कोणतेही मोठे देश लढाई-चढाईच्या फंदात पडणार नाहीत, भूभागावरून तर नाहीच नाही’ असा जो काही विश्वास होता तो धुळीला मिळाला आहे.**

देशांच्या सीमा तरी अनाघ्रातच राहणार असल्याची जी समजूत झाली, ती जर्मनीच्या १९८९ मधल्या एकीकरणानंतर बळकट झाली होती, पण तिलाही फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरुंग लागला. ‘नाटो’ने पूर्व युरोपातल्या देशांना कवेत घेण्यामागे अमेरिकेची फूस असल्याचा आरोप करत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आक्रमणाचे समर्थन करताहेत आणि तिसऱ्या वर्षीही हे युद्ध सुरूच राहील अशी चिन्हे आहेत. म्हणजे रशियासारखा अण्वस्त्रसज्ज देश, सलग महिनोनमहिने कुठल्याशा भूभागाच्या वादापायी पारंपरिक शस्त्रास्त्रांनिशी लढत राहतो आहे. त्या देशाने सहनशक्तीची परिसीमा वगैरे युक्तिवाद वापरले तर अण्वस्त्रसज्जतेचीही चुणूक दिसेल का हा प्रश्न अनुत्तरित आहे. भारताच्या संदर्भात हे महत्त्वाचे कारण १९९३ मध्ये झालेला शांतता करार धुडकावून चीनने २०२० मध्ये गलवान खोऱ्यात



घुसखोरी केली. तेव्हापासून दोन्ही देशांनी संयम पाळलेला असला तरी, बीजिंगमधून २०२४ मध्ये कुरापतीचा विचार केला जाणारच नाही याची खात्री नाही. आता २०२३ च्या धडयांकडे पाहू. ७ ऑक्टोबरला हमासने केलेल्या दहशतवादी हल्ल्याला इस्रायलकडून कडवे प्रत्युत्तर मिळते आहे. यावर काही तोडगा निघण्याची शक्यता अद्यापही दिसत नाही. पॅलेस्टाइनची समस्या ही फार आधीपासून आहेच. तिचे इस्रायली वसाहतखोरी, दमन आणि वंशभेद असे पदरही वेळोवेळी उघड झालेले आहेत. पण या समस्येची उकल केवळ सशस्त्र हल्ल्याने होऊ शकत नाही. हे विसरून हमाससारख्या राष्ट्रबाह्य (जरी त्यांना कथित पॅलेस्टाइन सरकार आणि इराणचा पाठिंबा असला तरी राष्ट्रबाह्यच) संघटनेने हल्ल्याचा माथेफिरूपणा केला. त्याची तीव्रता जबर होतीच पण संपूर्णत: गोपनीयता पाळून, इस्रायलसारख्या तगडी गुप्तचर यंत्रणा बाळगणाऱ्या देशाला ठार बेसावध गाठून हमासने हे घडवले.

हे सुरू असताना डिसेंबरपासून येमेनमधले हूथी बंडखोर कार्यरत झाले. हेसुद्धा राष्ट्रबाह्य शक्ती म्हणावेत असे लोक. पॅलेस्टिनींवर इस्रायलने चालवलेल्या जुलमाचा निषेध म्हणून या हूथींनी, इस्रायलशी दूरान्वयानेच संबंध असलेल्या व्यापारी जहाजांवर हल्ले आरंभलेले आहेत. त्यांचा परिणाम जागतिक व्यापारावर होऊ लागला, तेव्हा अमेरिकेला समविचारी देशांचे ‘नौदल कृती पथक’ स्थापन करण्याची खटपट करावी लागली. पण या पथकातले देश नक्की ‘समविचारी’ आहेत का? ब्रिटन, इटली, फ्रान्स, स्पेन, ग्रीस तसेच इतर देशांचा या पथकात समावेश आहे- यापैकी कैक देशांनी इस्रायलने मानवी हक्कांचा विचार करावा अशा मागणीचे ठराव अमेरिकेच्या विरोधाला न जुमानता संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत आणले होते. त्यामुळे अमेरिकेला या पथकाची जबाबदारी मर्यादितच असल्याचे भान सतत पाळावे लागणार आहे.इथेही ‘तगडी यंत्रणा बाळगणाऱ्यांना एखाद्या राष्ट्रबाह्य शक्तीने ठार बेसावध गाठणे’ हे सूत्र दिसून येते. हूथींकडे धड नौदल म्हणावे असे काही नाही. ड्रोनसारखे तुलनेने स्वस्त तंत्रज्ञान वापरून त्यांनी व्यापारी जहाजांवर स्फोटके डागली. हूथींनी याआधी क्षेपणास्त्रेही वापरली होती, हे लक्षात घेता त्यांना कुणाचा (इराणचा) कसा छुपा पाठिंबा आहे आणि शस्त्रास्त्रांची तस्करी कशी होते या मुद्दयांपेक्षा यापुढे हे हल्ले कोणत्या थराला जाणार हा प्रश्न अधिक तातडीचा ठरतो. भारतालादेखील ती जाणवावी, अशी परिस्थिती २३ डिसेंबरला आली. अरबी समुद्रात, भारताच्या किनाऱ्यापासून २०० सागरी मैलांच्या अंतरावर ‘एमव्ही केम प्लूटो’ या जहाजावर हल्ला झाला. यानंतर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी तातडीची बैठक बोलावली होती. युक्रेन, इस्रायल आणि व्यापारी जहाजे.. या सर्वांवरील हल्ले बेसावध गाठूनच झालेले आहेत. गुप्तचर यंत्रणांच्या मर्यादा तर यातून उघड होतातच पण व्यूहात्मक ताणसुद्धा यातून लक्षात यावा.

## संपादकीय »

### दुआओं का ‘असर’!

***‘ऑप्शन’ला टाकलेला, त्यामुळे शिक्षण खात्याकडे आर्थिक तरतूद नाही, शिक्षक कामाच्या भाराने कावलेले..***

नेमेचि येणारा पाऊस, धनाढयांच्या धडधडीत दावोसी गप्पा, त्यानिमित्ताने प्रसृत होणारा ‘ऑक्सफॅम’ विषमता अहवाल आणि याप्रमाणे राज्यातील शालेय मठ्ठतेचे मापन करणारी ‘असर’ पाहणी हीदेखील आता दिनदर्शिकेतील नैमित्तिक बाब. विद्यार्थ्यांची बौद्धिक दारिद्र्य रेषा अधिक खाली गेल्याचे आणि त्याखालील विद्यार्थिसंख्या वाढल्याचे वर्तमान आपणा सर्वास कळाले. ‘असर’च्या (‘प्रथम’चा ॲन्युअल स्टेट्स ऑफ एज्युकेशन रिपोर्ट) या अहवालानुसार १४ ते १८ या वयोगटातील विद्यार्थ्यांना तिसरीच्या इयत्तेतील गणितेही सोडवता येत नाहीत, २५ टक्के विद्यार्थी धड वाचनही करू शकत नाहीत, बारावीत जाऊनही साधा भागाकार जमत नाही आणि सगळयात महत्त्वाचे म्हणजे जे शिकवले गेले त्याचा व्यवहारात वापरही करता येत नाही. म्हणजे सगळेच पालथ्या घडयावरून पाणी.

**येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय आघाडीवर वातावरण चांगलेच तापायला लागले आहे. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या हिंदी पट्टयातील राज्यांमधील विजयापाठोपाठ अयोध्येतील राम मंदिरात होणाऱ्या प्राणप्रतिष्ठेमुळे भाजपच्या गोटात कमालीचे उत्साहाचे वातावरण दिसते आहे.**

# भाजपच्या विरोधात लढण्यासाठी उमेदवार

दुसरीकडे विरोधी आघाडीतील रुसवेफुगवे अद्यापही दूर झालेले नाहीत. इंडिया आघाडीची स्थापना होऊन पाचेक महिने झाले तरी अजूनही घटक पक्षांमध्ये एकवाक्यता झालेली दिसत नाही. जागावाटप हा कळीचा मुद्दा चर्चेच्या पुढे सरकत नाही. कोणत्याही राज्यात इंडिया आघाडीच्या घटक पक्षांमध्ये जागावाटपावर सहमती झालेली नाही. भाजपच्या विरोधात लढण्यासाठी एकास एक उमेदवार उभे करण्याचे विरोधकांचे प्रयत्न असले तरी त्यांत यश येताना दिसत नाही. इंडिया आघाडीच्या प्रमुखपदी काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची नियुक्ती करण्यावर नेतेमंडळींमध्ये सहमती झाली असली तरी त्याची अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. राहुल गांधी यांच्या दुसऱ्या टप्प्यातील भारत न्याय यात्रेला मणिपूरमधून सुरुवात झाली आहे. त्यांनी यात्रा ज्या राज्यांमधून जाणार आहे, तेथील विविध नेत्यांना सहभागी होण्यासाठी निमंत्रण दिले असले तरी मोठया




राजकीय पक्षांपैकी कोणीच ते अद्याप स्वीकारलेले नाही. आधी जागावाटप निश्चित मगच सहभाग, अशी इंडिया आघाडीतील घटक पक्षांची भूमिका आहे. काँग्रेसचे नेतृत्व मान्य करण्यास इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे नेते तयार नाहीत. पंजाब आणि दिल्लीतील २० जागांवरील काँग्रेस आणि आम आदमी पक्षातील जागावाटपाचा तिढा अजूनही कायम आहे. काँग्रेसची उत्तर प्रदेशात अधिक जागांची मागणी मान्य करण्यास समाजवादी पार्टीचे सर्वेसर्वा अखिलेश यादव तयार नाहीत. बिहारमध्ये नितीशकुमार-लालूप्रसाद यांची जोडी काँग्रेसला फारसे महत्त्व देण्यास तयार नाही. काँग्रेस नेत्यांनीही परिस्थितीचे भान ओळखून आणि स्वत:ची घटलेली ताकद लक्षात घेता जागावाटपात एक पाऊल मागे घेण्याची तयारी दाखविणे अपेक्षित आहे. राहुल गांधी यांच्या यात्रेला उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेशमध्ये कसा आणि किती प्रतिसाद मिळतो यावरही बरेच अवलंबून असेल. भाजपच्या आक्रमक भूमिकेचा सामना करण्यासाठी इंडिया आघाडीच्या नेत्यांनी एकत्र आल्याशिवाय पर्याय नाही. यासाठी दोन पावले मागे घेण्याची तयारी त्यांना ठेवावी लागेल. लोकसभेच्या सर्वाधिक ८० जागा असलेल्या उत्तर प्रदेशवर सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष असणे स्वाभाविकच. उत्तर प्रदेशमध्ये भाजपच्या विरोधात प्रत्येक जागेवर इंडिया आघाडीकडून एकच उमेदवार उभा करण्याच्या दृष्टीने चाचपणी सुरू झाली होती. पण लोकसभेची निवडणूक स्वबळावर लढण्याचे बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी जाहीर केल्याने विरोधकांचा हा प्रस्ताव बारगळल्यात जमा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठादिनी सुट्टी!

## देशभरात आनंदोत्सव : विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उत्तर प्रदेशातील अयोध्येत सोमवार २२ जानेवारीला रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होत आहे. या निमित्त राम मंदिरात विविध धार्मिक विधींना सुरूवात झाली आहे. संपूर्ण देश राममय झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सोमवार २२ जानेवारी रोजी राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. या संदर्भातील माहिती 'महाराष्ट्र भाजप'ने त्यांच्या अधिकृत 'X' अकाऊंटवरून दिली आहे.**



रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देशातील महाराष्ट्रासह, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, हरियाणा आणि छत्तीगड या राज्यांमध्ये सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या संदर्भातील माहिती महायुती सरकारने पत्राद्वारे दिली आहे.यापूर्वी राम मंदिर प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सोमवार २२ जानेवारी रोजी सर्व सरकारी कार्यालयांमध्ये अर्धा दिवस सुट्टी जाहीर केली आहे. याविषयी केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी सांगितले आहे की, सर्व कार्यालये २२ जानेवारीला अर्धा दिवस बंद राहतील. त्यानंतर दुपारी २.३० नंतर कार्यालये सुरू होतील. तसेच काही राज्यांमध्ये शैक्षणिक संस्थांना सुट्टी देण्यात आली आहे. तर काही ठिकाणी मद्यविक्री बंद ठेवण्यात आली आहे. यामध्ये उत्तर प्रदेश, गोवा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, हरीयाणा यांचा समावेश आहे. सोमवार २२ जानेवारीला अयोध्येतील राम मंदिर प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम होत आहे. त्या दिवशी अयोध्येसह देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना विविध कार्यक्रमात सहभागी होता यावे म्हणुन केंद्र सरकारने अर्ध्या दिवसाची सुट्टी दिली आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय केंद्र सरकारची सर्व कार्यालये, केंद्र सरकारच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्था आणि आस्थापनांना लागु आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी याबाबत माहिती दिली आहे. याचबरोबर हरियाणा आणि महाराष्ट्र या राज्यांनी २२ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. (Ayodhya Ram Mandir Updates) २२ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदींसह विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम पार पडणार आहे. दरम्यान, १६ जानेवारीपासुन अयोध्या मंदिर परिसरात विविध कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे. राम मंदिर प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाच्या दिवशी उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, आसाम, छत्तीसगड, उत्तराखंड, हरियाणा या राज्यांमध्ये मद्यविक्री बंद ठेवण्यात आली आहे. तर काही राज्यांमध्ये शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. लखनऊ विद्यापीठाचे वेळापत्रक बदलुन परिक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. उत्तर प्रदेश विधान परिषदेसाठी होत असलेली पोटनिवडणुक देखील एक दिवस पुढे ढकलण्यात आली आहे. येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येतील राम मंदिरात श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. संपूर्ण देशभरात आत्तापासूनच या सोहळ्याचा उत्साह पाहायला मिळत आहे. अयोध्येत या सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ही प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. श्री राम जन्मभूमी ट्रस्टने देशभरातील हजारो दिग्गजांना या सोहळ्याचं निमंत्रण पाठवलं आहे. तसेच मंदिर ट्रस्ट या सोहळ्याचं थेट प्रक्षेपण करणार आहे. त्यामुळे देशभरातील नागरिक दृकश्राव्य माध्यमातून हा सोहळा पाहू शकतील. दरम्यान, मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी २२ जानेवारी रोजी हाफ डे घोषित केला आहे.

### सहा दिवस बँका बंद

» पाठोपाठ महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही मोठा निर्णय जाहीर केला आहे.उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि गोव्यापाठोठ महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारनेही येत्या २२ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. राम मंदिर उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर या सुट्टीची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली होती की, राज्य सरकारने येत्या २२ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी. राज्य मंत्रिमंडळाने ही मागणी मान्य केली आहे. राज्य सरकारने अधिकृत परिपत्रक काढून ही सुट्टी जाहीर केली आहे. हजरत मोहम्मद अली यांच्या जयंतीनिमित्त २५ जानेवारी रोजी बँकांना सुट्टी असणार आहे. तर २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त सुट्टी आहे. त्यामुळे या दिवशीदेखील बँका बंद असतील. २७ जानेवारी रोजी या महिन्यातला चौथा शनिवार असल्याने याही दिवशी बँका बंद असणार आहेत. २१ आणि २८ जानेवारी रोजी रविवार आहे. तर २२ जानेवारी रोजी राज्य सरकारने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. याचाच अर्थ २१ जानेवारी ते २८ जानेवारी या आठ दिवसांपैकी केवळ दोनच दिवस (२३, २४ जानेवारी) बँका सुरू असतील.

# राज्यातून युरोपीय देशांसह अरब देशांत द्राक्षनिर्यात

## अनुकूल वातावरणामुळे द्राक्षनिर्यातीचा उच्चांकी अंदाज

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातून युरोपीय देशांसह चीन, रशिया, श्रीलंका आणि अरब देशांत द्राक्षनिर्यात सुरू झाली आहे. जानेवारीच्या सुरुवातीपासून नेदरलॅण्ड आणि हॉलंडला प्रामुख्याने निर्यात वाढली आहे. मागील १५ दिवसांत नाशिक, सांगलीतून युरोपला ३६४ कंटेनरमधून ४८७० टन द्राक्षे निर्यात झाली आहेत.**



महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष शिवाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातून जानेवारीच्या सुरुवातीपासून युरोपीय देशांना निर्यात सुरू झाली आहे. सुमारे ९० ते १०० रुपये प्रतिकिलो दराने नेदरलँड आणि हॉलंडला निर्यात होत आहे. युरोपच्या निर्यातीसाठी हिरव्या रंगाच्या थॉमसन, क्लोन टू, तास-ए-गणेश जातीच्या गोल द्राक्षांची गरज असते. युरोपला निर्यात होणाऱ्या द्राक्षांना चांगला दर मिळतो. त्यामुळे ही निर्यात आर्थिकदृष्ट्या जास्त फायदेशीर ठरते.युरोपला निर्यात सुरू होण्यापूर्वीच अरब देश, चीन, श्रीलंका आणि रशियाला निर्यात सुरू झाली होती. चीनवगळता अन्य देशांना हिरव्या रंगाची आणि लांब द्राक्षे निर्यात होतात. प्रामुख्याने माणिक चमन, सुपर, एसएस, अनुष्का आणि सोनाका जातींच्या द्राक्षांची निर्यात होते. साधारण ७० ते ८० रुपये किलो दराने ही निर्यात सुरू आहे.चीनली होणारी निर्यात यंदा सुरळीत आहे. करोना काळानंतर लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमुळे मागील दोन वर्षे निर्यात विस्कळीत झाली होती. या वर्षी चिनी आयातदार आणि देशातील निर्यातदारांनी शीतगृहांच्या तपासण्या पूर्ण केल्यामुळे चीनला होणारी निर्यात सुरळीत झाली आहे. चीन आणि चीनशेजारील आग्नेय आशियाई देशांतून जाड मण्यांच्या काळ्या रंगाच्या शरद, ज्योती, सरिता, कृष्णा जातीच्या द्राक्षांना मागणी असते. सध्या राज्यात काळ्या रंगाची द्राक्षे अपेक्षित प्रमाणात काढणीला आली नाहीत. साधारण १०० ते १३० रुपयांनी ही निर्यात सुरू आहे. जानेवारीअखेरीस चीनला होणारी निर्यात वेग घेण्याचा अंदाज आहे.

### यंदा उच्चांकी निर्यात

» पुढील दोन-तीन महिने अनुकूल वातावरण राहिल्यास द्राक्ष निर्यात वाढण्याचा अंदाज आहे. मागील वर्षी फक्त युरोपला ६,७९६ कंटेनरमधून ९०,४९३ टन द्राक्षांची निर्यात झाली होती. यंदा पहिल्या १५ दिवसांत ३६४ कंटेनरमधून ४,८७० टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. चांगले हवामान राहिल्यास यंदा उच्चांकी निर्यात होण्याचा अंदाज असून, मार्चपर्यंत निर्यात सुरू राहील, असा अंदाज राज्याचे कृषी मालाचे निर्यात सल्लागार गोविंद हांडे यांनी व्यक्त केला आहे.

# आम्हाला महत्त्व नाही दिलं तर!

## » विरोधी आघाडी'इंडिया'समोर सर्वात मोठा प्रश्न जागा वाटपाचा

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**इंडिया आघाडीमध्ये सध्या पश्चिम बंगालच्या (WEST BANGAL) जागा वाटपावरुन संभ्रम असल्याचं चित्र पाहायला मिळतंय. त्याच पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसच्या (TMC) प्रमुख ममता बॅनर्जी (MAMATA BANERJEE) यांनी यासंदर्भात भाष्य केलं. त्यांनी यावेळी काँग्रेसला (CONGRESS) थेट इशाराच दिलाय. जर तृणमूल काँग्रेसला योग्य महत्त्व न दिल्यास राज्यातील सर्व 42 लोकसभेच्या जागा स्वबळावर लढवण्यास आम्ही तयार आहोत, असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पक्षाच्या मुर्शिदाबाद जिल्हा युनिटच्या बंद दरवाजा संघटनात्मक बैठकीत आपली भूमिका जाहीर केली. मुर्शिदाबाद हा एक लक्षणीय अल्पसंख्याक लोकसंख्या असलेला भाग आहे आणि पारंपारिकपणे काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून पाहिले जाते.**



बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील तीनही लोकसभा जागांवर टीएमसीच्या विजयावर भर दिला आणि पक्षाच्या नेत्यांना निवडणुकीच्या लढाईसाठी तयार राहण्याचे आवाहन केले. 2019 च्या निवडणुकीत काँग्रेसला फक्त बहरामपूर जागा राखण्यात यश आले, जिथून त्यांचे पाच वेळा खासदार आणि प्रदेश पक्षाचे अध्यक्ष अधीर रंजन चौधरी उभे होते. टीएमसीच्या एका वरिष्ठ नेत्याने म्हटलं की, "आमच्या पक्षाच्या सुप्रीमो ममता बॅनर्जी यांनी स्पष्टपणे सांगितले की टीएमसी इंडिया आघाडीच्या सर्वात महत्वाच्या भागीदारांपैकी एक आहे. पण जर बंगालमध्ये आम्हाला वगळून आरएसपी, सीपीआय, सीपीआय (एम) ला जास्त महत्त्व दिले जास्त महत्त्व दिले जाते, मग आम्ही स्वतःचा मार्ग बनवू. "आपण सर्व 42 जागा लढवण्याची आणि जिंकण्याची तयारी केली पाहिजे. सीपीआय(एम) च्या नेतृत्वाखालील काँग्रेस आणि टीएमसी एकत्रितपणे इंडिया आघाडीचा भाग आहेत. पश्चिम बंगालमध्ये मात्र सीपीआय(एम) आणि काँग्रेसने टीएमसी आणि भाजपविरोधात आघाडी केली आहे. तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्याने दिलेल्या माहितीनुसार, पक्षप्रमुख म्हणाले की आम्हाला लोकसभेच्या तीनही जागा जिंकण्यासाठी तयारी करण्याची गरज आहे. आमचे एक आमदार हुमायून कबीर यांनी जेव्हा सांगितले की अधीर रंजन चौधरी हे अल्पसंख्याक बहुल जिल्ह्यात एक घटक आहेत, तेव्हा बॅनर्जी यांनी या दाव्याला जास्त महत्त्व देण्यास नकार दिला आणि म्हणाले की TMC एकजुटीने लढली तर यश मिळेल. त्यामुळे आता इंडिया आघाडीमध्ये पश्चिम बंगालच्या जागावाटपावरुन संभ्रम निर्माण होत असल्याचं पाहायला मिळत आहे. इंडिया आघाडीमध्ये सध्या पश्चिम बंगालच्या (WEST BANGAL) जागा वाटपावरुन संभ्रम असल्याचं चित्र पाहायला मिळतंय. त्याच पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसच्या (TMC) प्रमुख ममता बॅनर्जी (MAMATA BANERJEE) यांनी यासंदर्भात भाष्य केलं.

त्यांनी यावेळी काँग्रेसला थेट इशाराच दिलाय. जर तृणमूल काँग्रेसला योग्य महत्त्व न दिल्यास राज्यातील सर्व 42 लोकसभेच्या जागा स्वबळावर लढवण्यास आम्ही तयार आहोत, असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पक्षाच्या मुर्शिदाबाद जिल्हा युनिटच्या बंद दरवाजा संघटनात्मक बैठकीत आपली भूमिका जाहीर केली. मुर्शिदाबाद हा एक लक्षणीय अल्पसंख्याक लोकसंख्या असलेला भाग आहे आणि पारंपारिकपणे काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून पाहिले जाते. बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील तीनही लोकसभा जागांवर टीएमसीच्या विजयावर भर दिला आणि पक्षाच्या नेत्यांना निवडणुकीच्या लढाईसाठी तयार राहण्याचे आवाहन केले.

### टीएमसी आणि भाजपविरोधात आघाडी

» .पण जर बंगालमध्ये आम्हाला वगळून आरएसपी, सीपीआय, सीपीआय (एम) ला जास्त महत्त्व दिले जास्त महत्त्व दिले जाते, मग आम्ही स्वतःचा मार्ग बनवू. "आपण सर्व 42 जागा लढवण्याची आणि जिंकण्याची तयारी केली पाहिजे.पश्चिम बंगालमध्ये मात्र सीपीआय(एम) आणि काँग्रेसने टीएमसी आणि भाजपविरोधात आघाडी केली आहे. तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्याने दिलेल्या माहितीनुसार, पक्षप्रमुख म्हणाले की आम्हाला लोकसभेच्या तीनही जागा जिंकण्यासाठी तयारी करण्याची गरज आहे.


# 'या' देशाचं भारताच्या पावलावर पाऊल

## » चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करणारा पाचवा देश

| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**जपानचं स्लिम मून मिशन यशस्वी झालं आहे. या चांद्रमोहिमेअंतर्गत जपानने त्यांचं अवकाशयान चंद्राच्या पृष्ठभागावर उतरवलं आहे. याद्वारे जपान हा चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करणारा पाचवा देश ठरला आहे. जपानच्या आधी भारत, रशिया, अमेरिका आणि चीन हे देश चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करण्यात यशस्वी ठरले आहेत. स्लिम म्हणजे स्मार्ट लँडर फॉर इन्वेस्टिगेटिंग मून मिशन या यशस्वी मोहिमेनंतर जपानची अंतराळ संशोधन संस्था JAXA चं जगभरात कौतुक होत आहे.**



गेल्या वर्षी ७ सप्टेंबर रोजी जपानी अंतराळ संशोधन केंद्राचं हे अवकाशयान चंद्राच्या दिशेनं झेपावलं होतं. चार महिन्यांच्या प्रवासानंतर हे यान चंद्राच्या पृष्ठभागावर उतरलं आहे. २५ डिसेंबर रोजी या यानाने चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला होता. या यानाची लांबी २.४ मीटर आणि रुंदी २.७ मीटर इतकी आहे. या यानाच्या लँडरचं वजन २०० किलो इतकं आहे. यामध्ये रडार, लेजर रेंज फाइंडर आणि व्हिजन बेस्ड नेव्हिगेशन सिस्टिम आहे. या अवकाशयानावरील कॅमेरे चंद्राच्या पृष्ठभागाचे, तिथल्या दगड-मातीचे स्पष्ट फोटो क्लिक करतील आणि ते JAXA ला पाठवले जातील. तसेच यामध्ये लुनार एक्स्प्लोरेशन व्हेईकल आणि लुनार रोबोटदेखील आहे. यामध्ये वापरण्यात आलेलं पिन पॉइंट लँडिंग तंत्रज्ञान हे अशी अवकाशयानं इतर ग्रहांवर उतरवण्यासाठी योग्य आहें असं JAXA ने म्हटलं आहे. या मोहिमेअंतर्गत चंद्रावरील लँडिंग केलेल्या जागेपासून १०० मीटरपर्यंतच्या परिसराचं सर्वेक्षण केलं जाईल, असंही JAXA ने सांगितलं आहे.ज्या जागेवर हे यान उतरवण्यात आलं त्या लँडिंग साईटला शिओली क्रेटर असं नाव देण्यात आलं आहे. हा चंद्रावरील सर्वाधिक गडद अंधार असलेला परिसर आहे. चंद्राचा पृष्ठभाग पाहिल्यास त्यावरील एक सर्वाद गडद काळा डाग म्हणजे ही लँडिंग साईट आहे. चंद्रावर असा आणखी एक डाग (गडद अंधार असलेला प्रदेश) आहे. मेयर नेक्टारिस असं त्या साईटचं नाव आहे. या जागेला चंद्राचा समुद्रदेखील म्हटलं जातं. जपाने अंतराळ संशोधन केंद्र आता शिओली क्रेटर प्रदेशात संशोधन करणार आहे.

# राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळा थांबवला जाणार?


| नवी दिल्ली |

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

अयोध्येत बांधल्या जाणाऱ्या राम मंदिरात येत्या सोमवारी (२२ जानेवारी) श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. श्री रामजन्मभूमी ट्रस्टने या दिवशी मोठ्या सोहळ्याचं आयोजन केलं असून हजारो लोकांना या कार्यक्रमासाठी निमंत्रण पाठवलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. एका बाजूला मंदिराचं बांधकाम वेगाने चालू आहे. दुसऱ्या बाजूला मंदिरात होणाऱ्या सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. दरम्यान, २२ जानेवारी रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाला स्थगिती द्यावी, यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. तसेच याचिकाकर्त्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा केली जाऊ नये, अशी मागणीदेखील केली आहे. यासह त्यांनी चार पीठांच्या शंकराचार्यांनी या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर घेतलेल्या आक्षेपांचा दाखला दिला आहे. शंकराचार्यांच्या मते हा सोहळा सनातन परंपरेच्या विरोधात आहे.दरम्यान, अलाहाबाद उच्च न्यायालयाने या याचिकेबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे २२ जानेवारी रोजी अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनाचा आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला आहे.

# 'ॲनिमल'च्या यशानंतर उपेंद्र लिमये पुन्हा गाजवणार बॉलीवूड!

रणबीर कपूर, अनिल कपूर, रश्मिका यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'ॲनिमल' चित्रपट अलीकडेच प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डब्रेक कामगिरी करत तब्बल ९०० कोटींहून अधिक गल्ला जमावला आहे. 'कबीर सिंग' फेम संदीप रेड्डी वांगाने या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटातील प्रमुख अभिनेत्यांप्रमाणेच 'ॲनिमल' प्रदर्शित झाल्यावर मराठी अभिनेते उपेंद्र लिमये यांच्या फ्रेडी पाटील भूमिकेची देखील सर्वत्र चर्चा रंगली होती. 'ॲनिमल'मध्ये उपेंद्र लिमये यांनी शस्त्रसाठा पुरवणाऱ्या डीलरची लहानशी भूमिका साकारली आहे. लहान असली तरीही ही भूमिका प्रेक्षकांसाठी चांगलीच लक्षवेधी ठरली. उपेंद्र यांच्या एन्ट्रीच्या सीनचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. याचे अनेक व्हिडीओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल



झाले होते.'ॲनिमल'च्या यशानंतर बॉलीवूडप्रमाणे मराठी कलाविश्वात देखील उपेंद्र यांची जोरदार चर्चा रंगली होती. बिग बजेट सिनेमातील कामाचं भरभरून कौतुक झाल्यावर आता उपेंद्र लिमये पुन्हा एकदा बॉलीवूड गाजवण्यासाठी सज्ज झाले आहे. त्यांनी नव्या सिनेमाची पहिली झलक इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे.'ॲनिमल'नंतर उपेंद्र लिमये हे अभिनेता कुणाल खेमू लिखित-दिग्दर्शित 'मडगाव एक्स्प्रेस' चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणार आहेत. यामध्ये अविनाश तिवारी, प्रतिक गांधी, दिव्येंदु यांच्या प्रमुख भूमिका असणार आहेत. 'मडगाव एक्स्प्रेस' हा बहुचर्चित चित्रपट २२ मार्चला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.उपेंद्र यांच्या एन्ट्रीच्या सीनचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. याचे अनेक व्हिडीओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.

## रणबीरला चापट मारल्यानंतर

गेल्या काही दिवसांमध्ये रणबीर कपूरच्या 'ॲनिमल' चित्रपटाची मोठ्या प्रमाणात चर्चा रंगल्याचे पाहायला मिळाले होते. संदीप वांगा रेड्डी दिग्दर्शित या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डतोड कमाई केली होती. या चित्रपटात रणबीरबरोबर साऊथची सुपरस्टार रश्मिका मंदानाची प्रमुख भूमिका होती. 'ॲनिमल'मध्ये रश्मिकाने रणबीरच्या पत्नीची भूमिका साकारली आहे. दरम्यान, या चित्रपटात रश्मिका रणबीरला रागाच्या भरात चापट मारते, असा एक सीन दाखवण्यात आला आहे. या सीननंतर रश्मिका खूप रडली होती. रश्मिका म्हणाली, "हा संपूर्ण सीन एकाच टेकमध्ये शूट करण्यात आला होता. सीनमध्ये काय करायचं आहे हे मला अजिबात माहिती नव्हतं. संदीपनं मला फक्त अशा परिस्थितीत एखादी व्यक्ती कशी वागेल याचा तू विचार कर आणि तूसुद्धा तशीच वाग, असं सांगितलं होतं आणि मीसुद्धा अगदी तसंच केलं. मला फक्त एवढंच आठवतंय.

## ऐश्वर्याने सांगितला गंमतीशीर किस्सा



ऐश्वर्या राय बच्चन आणि अभिषेक बच्चन हे बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल्सपैकी एक आहेत. २० एप्रिल २००७ मध्ये दोघांनी लग्नगाठ बांधली. गेल्या काही दिवसांपासून ऐश्वर्या व अभिषेकच्या घटस्फोटाची चर्चा चांगलीच रंगली होती. मात्र, दोघांनी सोशल मीडियावर एकत्र फोटो शेअर करत या चर्चांना पूर्णविराम दिला होता. दरम्यान ऐश्वर्याचा एक जुना व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये तिने तिच्या व अभिषेकच्या रोका विधीबाबत गंमतीशीर किस्सा सांगितला आहे.ऐश्वर्या रायचा हा व्हिडिओ एका फॅन पेजने त्याच्या इंस्टाग्राम हँडलवर शेअर केला आहे. एका मुलाखती दरम्यानचा हा व्हिडीओ आहे. दरम्यान या मुलाखतीत तिने तिच्या व अभिषेकच्या लग्नाच्या विधीसंबंधीत किस्सा सांगितला आहे. ऐश्वर्या म्हणाली, "माझ्या व अभिषेकच्या रोका समारंभासाठी जेव्हा अभिषेकचे कुटुंबीय माझ्या घरी येत असल्याचे मला समजले तेव्हा मला आश्चर्य वाटलं. अचानकपणे होणारा हा रोका विधी हे माझ्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी खूप आश्चर्यकारक होता. कारण आमच्या कुटुंबात कोणालाच या विधीचा अर्थही माहिती नव्हता."ऐश्वर्या पुढे म्हणाली, "माझं कुटुंब साऊथ पद्धतीचे कुटुंब आहे, त्यामुळे आमच्या कुटुंबात रोकासारखा कोणताही विधी नाही एक दिवस अचानक मला अभिषेकच्या घरून फोन आला की आम्ही येत आहोत. त्या दिवशी माझे वडीलही घरी नव्हते, ते गावाबाहेर होते आणि त्यांना यायला एक दिवस लागणार होता. मी अभिषेकला सांगितले की माझे वडील घरी नाहीयेत. यावर अभिषेक म्हणाला, 'मी माझ्या घरच्यांना आता थांबवू शकत नाही, आम्ही निघालो आहोत आणि रस्त्यात आहोत. त्यादिवशी ते सगळे आमच्या घरी आले आणि आमचा रोका पार पडला."

## सचिन तेंडुलकरने शूटिंगसाठी दिला नकार

प्रल्हाद कक्कर यांनी ९० च्या दशकात अनेक बॉलीवूड कलाकार व क्रिकेटपटूंबरोबर जाहिराती केल्या होत्या. त्या जाहिराती प्रचंड गाजल्या होत्या. त्यांनी त्यांचे 'ॲडमन मॅडमॅन' हे पुस्तक प्रकाशित केले. त्यानिमित्ताने त्यांनी काही आघाडीच्या स्टार्सबरोबर काम करतानाच्या काही आठवणी सांगितल्या. त्यांनी सचिन तेंडुलकर अवघा १६ वर्षांचा असताना त्याच्याबरोबर काम केलं होतं. त्यावेळचा एक किस्सा सांगितला. सचिन १६ वर्षांचा होता आणि भारतीय संघात त्याची निवड झाली होती. त्यानंतर त्याला 'पेप्सी' या ब्रँडच्या जाहिरातीसाठी साइन करण्यात आलं होतं. त्यावेळी प्रल्हाद यांनी सचिनची चेष्टा केली होती. त्यावेळी सचिन म्हणाला होता की तो शूट न करता घरी जाईल. त्यावेळी पेप्सीने एक स्पर्धा सुरू केली होती आणि स्पर्धेतील विजेत्याला खेळाडूंच्या बॉक्समध्ये टीमबरोबर बसण्याची संधी मिळायची. "मी म्हणालो की या स्पर्धेची विजेती एक मुलगी असेल आणि तू तिला हाताने पकडून खेळाडू बसतात, त्या बॉक्समध्ये न्यायचं आहेस. तो म्हणाला, 'नाही, मी ते करू शकत नाही'. तर मी म्हणालो, 'का नाही?' तो म्हणाला, 'कारण मी कधीच कोणत्याही मुलीला असं पकडलेलं नाही'," असं प्रल्हाद म्हणाले.प्रल्हाद यांनी सचिनला विचारले की त्याच्या शाळेत मुली आहेत का? त्यावर सचिन म्हणाला की तो शाळेत कोणत्याही मुलीशी कधीच बोलला नाही. "तो म्हणाला, 'नाही, मी ही जाहिरात करू शकत नाही. मी घरी जात आहे'. मग मी त्याला सांगितले की आम्ही फक्त तुझी चेष्टा करत आहोत. तुला असं काहीही करण्याची गरज नाही. तिथे एक तरुण मुलगा असेल, जो तिला तिथे घेऊन जाईल. हे ऐकल्यानंतर सचिन सुटकेचा निःश्वास सोडला होता," असा किस्सा प्रल्हाद यांनी सांगितला.



## परदेशी खेळाडूला१० वर्षांपासून डेट करतेय तापसी

अभिनेत्री तापसी पन्नूने तिच्या लव्ह लाइफबद्दल भाष्य केलं आहे. ती बॅडमिंटनपटू मॅथियस बोबरोबर दहा वर्षांपासून रिलेशनशिप आहे, परंतु ती तिच्या नात्याबद्दल फारसं बोलत नाही. तापसीने तिचं नातं कधीच लपवलं नाही. आता नुकत्याच एका मुलाखतीत तापसीला डेटिंगबद्दल विचारण्यात आलं. त्यावर तिने तिच्या रिलेशनशिपचा उल्लेख केला. सेलिब्रिटी झाल्यानंतर डेटिंग करणं कठीण आहे का? असं विचारल्यावर तापसी म्हणाली की ती १० वर्षांपासून एकाच व्यक्तीसोबत आहे म्हणून याचं उत्तर काय द्यावं हे तिला कळत नाही. राज शामानीशी बोलताना तापसी म्हणाली, "गेल्या १० वर्षांपासून मी त्याच व्यक्तीसोबत आहे, मी १३ वर्षांपूर्वी अभिनय करायला सुरुवात केली आणि ज्या वर्षी मी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं, त्याच वर्षी मी त्याला भेटले आणि तेव्हापासून मी त्याच्यासोबत आहे. माझा त्याला सोडण्याचा किंवा इतर कोणासोबत राहण्याचा कोणताही विचार नाही कारण मी नात्यात खूप आनंदी आहे."काही महिन्यांपूर्वी तापसीने इन्स्टाग्रामवर 'आस्क मी एनिथिंग' सेशन ठेवलं होतं. तेव्हा एका चाहत्याने तिला विचारलं की ती कधी लग्न करणार आहे. यावर तापसी म्हणाली होती "मी अद्याप गरोदर नाही, त्यामुळे इतक्यात तरी नक्कीच लग्न करणार नाही.

# ऑस्ट्रेलियाने रचला इतिहास!

## 147 वर्षांच्या कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच 'हे' घडलं

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**ॲडलेडमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी सामन्यादरम्यान, ऑस्ट्रेलियन संघाने अशी कामगिरी केली, जी १४७ वर्षांच्या कसोटी क्रिकेट इतिहासात आजपर्यंत इतर कोणत्याही संघाला करता आलेली नाही. ऑस्ट्रेलिया हा पहिला संघ ठरला आहे, ज्यांच्या प्लेइंग इलेव्हनमधील चार गोलंदाजांनी कसोटी सामन्यात २५० हून अधिक विकेट घेतल्या आहेत. आजपर्यंत कसोटीत असे कधीच घडले नव्हते. या आकडेवारीच्या आधारे असे म्हणता येईल की ऑस्ट्रेलियाचे सध्याचे गोलंदाजी आक्रमण इतिहासातील सर्वात आक्रमक गोलंदाजी युनिट आहे.**





ऑस्ट्रेलियन संघ जेव्हा ॲडलेड कसोटीत वेस्ट इंडिजचा सामना करत होता, तेव्हा त्यांच्या इलेव्हनमध्ये असे तीन गोलंदाज होते, ज्यांनी २५० कसोटी विकेट्सचा टप्पा ओलांडला होता. पण ॲडलेड कसोटीदरम्यान ऑस्ट्रेलियाच्या आणखी एका गोलंदाजाने २५० कसोटी विकेट्सचा आकडा गाठला. हा गोलंदाज होता जोश हेझलवूड. हेझलवूडने या सामन्यात २४९ कसोटी विकेट्ससह प्रवेश केला होता. या सामन्यात त्याने पहिली विकेट घेताच ऑस्ट्रेलियन संघाने ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांच्यात खेळल्या जात असलेल्या कसोटी मालिकेतील पहिला सामना ऑस्ट्रेलियाने जिंकला. पहिल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या घातक गोलंदाजीसमोर वेस्ट इंडिजचे फलंदाज निष्प्रभ ठरले. ऑस्ट्रेलियाकडून कर्णधार पॅट कमिन्स आणि जोश हेझलवूड यांनी शानदार गोलंदाजी केली. दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजचा डाव अवघ्या १२० धावांत गुंडाळला. त्यानंतर ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी केवळ २६ धावांचे लक्ष्य होते. हे लक्ष्य पार करत ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजवर १० विकेट्सनी विजय नोंदवला. पहिल्या कसोटी सामन्यात पॅट कमिन्स आणि जोश हेझलवूड यांनी ऑस्ट्रेलियासाठी शानदार गोलंदाजी केली. या दोघांच्या गोलंदाजीसमोर वेस्ट इंडिजचा एकही फलंदाज जास्त वेळ खेळपट्टीवर टिकू शकला नाही. या सामन्यात हेझलवूडने ९ तर कमिन्सने ४ विकेट्स घेतल्या. जोश हेझलवूडने पहिल्या डावात गोलंदाजी करताना ४ आणि दुसऱ्या डावात ५ विकेट्स घेतल्या. याशिवाय कर्णधार पॅट कमिन्सने पहिल्या डावात ४ विकेट्स घेतल्या होत्या, तर दुसऱ्या डावात कमिन्सला एकही विकेट्स मिळू शकली नाही. याशिवाय मिचेल स्टार्कने २ आणि नॅथन लायननेही दुसऱ्या डावात २ विकेट्स घेतल्या. वेस्ट इंडिजचे ५ फलंदाज दुसऱ्या डावात दुहेरी धावसंख्याही गाठू शकले नाहीत. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने पहिल्या डावात १८३ धावा केल्या होत्या. वेस्ट इंडिजसाठी कर्क मॅकेन्झीने सर्वाधिक ५- धावांची खेळी साकारली, याशिवाय शमर जोसेफने ३६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात २८३ धावा केल्या आणि वेस्ट इंडिजविरुद्ध १०० धावांची आघाडी घेतली. त्यानंतर दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजचा संपूर्ण संघ अवघ्या १२० धावांत सर्वबाद झाला. त्यामुळे ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी केवळ २६ धावांचे लक्ष्य होते. ऑस्ट्रेलियाकडून फलंदाजी करताना ट्रॅव्हिस हेडने पहिल्या डावात शानदार शतक झळकावले. हेडने पहिल्या डावात ११९ धावांची खेळी साकारली होती. त्यामुळे या सामन्यात ट्रॅव्हिस हेडला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. या विजयासह ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजविरुद्ध मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

### इंडिजवर 10 विकेट्सनी विजय

» हे लक्ष्य पार करत ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजवर १० विकेट्सनी विजय नोंदवला. पहिल्या कसोटी सामन्यात पॅट कमिन्स आणि जोश हेझलवूड यांनी ऑस्ट्रेलियासाठी शानदार गोलंदाजी केली. या दोघांच्या गोलंदाजीसमोर वेस्ट इंडिजचा एकही फलंदाज जास्त वेळ खेळपट्टीवर टिकू शकला नाही. या सामन्यात हेझलवूडने ९ तर कमिन्सने ४ विकेट्स घेतल्या. जोश हेझलवूडने पहिल्या डावात गोलंदाजी करताना ४ आणि दुसऱ्या डावात ५ विकेट्स घेतल्या. याशिवाय कर्णधार पॅट कमिन्सने पहिल्या डावात ४ विकेट्स घेतल्या होत्या, तर दुसऱ्या डावात कमिन्सला एकही विकेट्स मिळू शकली नाही. याशिवाय मिचेल स्टार्कने २ आणि नॅथन लायननेही दुसऱ्या डावात २ विकेट्स घेतल्या. वेस्ट इंडिजचे ५ फलंदाज दुसऱ्या डावात दुहेरी धावसंख्याही गाठू शकले नाहीत.

# भारताने गमावला सलग दुसरा सामना

## भारताचा पराभव झाल्याने बाद फेरीत पोहोचणे झाले कठीण

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अहमद बिन अली स्टेडियमवर उझबेकिस्तानविरुद्ध ०-३ असा पराभव झाल्याने एएफसी आशियाई चषकच्या बाद फेरीतील भारताच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. गुरुवारी ब गटातील दुसऱ्या लढतीत उझबेकिस्तानने भारतीय पुरुष फुटबॉल संघाविरुद्ध खूप मजबूत असल्याचे सिद्ध केले. फिफा क्रमवारीत ६८व्या क्रमांकावर असलेल्या उझबेकिस्तानने पूर्वार्धात तीन गोल केले. त्यामुळे टीम इंडिया दडपणाखाली आली.**

भारतीय संघ उत्तरार्धात छाप पाडण्यात यशस्वी ठरला. उत्तरार्धात टीम इंडियाने अनेकवेळा चेंडू डी कडे पाठवला, पण उझबेकिस्तानच्या गोलरक्षकाने अप्रतिम बचाव केला, मात्र उझबेकिस्तान संघाने पूर्ण वेळेपर्यंत आपली आघाडी कायम ठेवली. उझबेकिस्तानसाठी अबोशबेक फैझुल्लाएवने चौथ्या मिनिटाला, इगोर सेर्गिएव्हने १८व्या मिनिटाला आणि शेरझोद नसरुल्लाएवने हाफ टाईमच्या आधी गोल केले. जागतिक क्रमवारीत भारत १०२व्या, तर उझबेकिस्तान ६८व्या क्रमांकावर आहे. या दोघांमध्ये आतापर्यंत एकूण नऊ सामने झाले आहेत. या नऊ सामन्यांमध्ये भारताने उझबेकिस्तानचा फक्त एकदा पराभव केला आहे. त्याचबरोबर सहा सामन्यात पराभव झाला असून दोन सामने अनिर्णित राहिले आहेत. भारतीय बचावफळीने सुरुवातीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपला उत्कृष्ट फॉर्म कायम राखण्यासाठी संघर्ष केला आणि अनेक प्रसंगी निराशाजनक कामगिरी केली. पहिला सामना गमावल्यानंतर आकाश मिश्रा, अनिरुद्ध थापा आणि नौरेम महेश ब्लू टायगर्ससाठी सुरुवातीच्या अकराव्यामध्ये आले पण स्टार मिडफिल्डर सहल अब्दुल समद दुखापतीमुळे बाहेर राहिला. उझबेकिस्तानने १० क्रमांकाच्या इबोस्बेक फैझुल्लायेवच्या सहाय्याने सुरुवातीची आघाडी घेतली, फैझुल्लायेवने उजव्या बाजूने क्रॉस वितरीत केला. स्ट्रायकर इगोर सर्गेव्हने फैझुल्लायेवच्या अप्रतिम प्रयत्नानंतर पोस्टच्या पाठीमागे मारलेल्या फटक्यानंतर २-० अशी आघाडी घेतली. सर्गीव्हला रिकामे नेट शोधण्यात कोणतीही अडचण आली नाही. त्यामुळे त्याने भारतीय बचावफळी अगदी सहज भेदली. खेळाचा तिसरा गोल पहिल्या हाफच्या शिट्टीपूर्वी झाला. लेफ्ट-बॅक शेरझोद नसरुल्लाएवने गुरप्रीत सिंग संधूला सहज हेडरने चकवा दिला. ब्लू टायगर्स ब गटात एकही गोल न करता चौथ्या स्थानावर असून २३ जानेवारीला होणाऱ्या तिसऱ्या सामन्यात त्यांचा सामना सीरियाशी होईल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ आणि सहा गटांतील चार सर्वोत्तम तृतीय क्रमांकाचे संघ बाद फेरीत प्रवेश करतील. अशा स्थितीत भारताला सीरियाविरुद्ध कोणत्याही किंमतीवर विजय मिळवावा लागेल. त्याच वेळी, त्यांना त्यांच्या नशिबावर देखील अवलंबून रहावे लागेल.




### दोन सामने अनिर्णित

» जागतिक क्रमवारीत भारत १०२व्या, तर उझबेकिस्तान ६८व्या क्रमांकावर आहे. या दोघांमध्ये आतापर्यंत एकूण नऊ सामने झाले आहेत. या नऊ सामन्यांमध्ये भारताने उझबेकिस्तानचा फक्त एकदा पराभव केला आहे. त्याचबरोबर सहा सामन्यात पराभव झाला असून दोन सामने अनिर्णित राहिले आहेत.